
# कोरोना महामारी आणि भारत




संपादक

डॉ.वाकणकर जी.बी.

प्रा.देवराये एस.एम.

डॉ.टेंगसे एस.ए.


Scanned with OKEN Scanner

# कोरोना महामारी आणि भारत

- संपादक -

डॉ. वाकणकर जी.बी.
प्रा.देवराये एस.एम.
डॉ.टेंगसे एस.ए.

Sonpeth Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani
College

NOTION PRESS

Scanned with OKEN Scanner

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

NOTION PRESS

India. Singapore. Malaysia.

Published by Notion Press 2021
Copyright © Wakankar G.B., Devraye S. M., Tengse S. A. 2021
All Rights Reserved.

ISBN 9781-6387-3493-2

This book has been published with all reasonable efforts taken to make the material error-free after the consent of the author. No part of this book shall be used, reproduced in any manner whatsoever without written permission from the author, except in the case of brief quotations embodied in critical articles and reviews.

The Author of this book is solely responsible and liable for its content including but not limited to the views, representations, descriptions, statements, information, opinions and references ["Content"]. The Content of this book shall not constitute or be construed or deemed to reflect the opinion or expression of the Publisher or Editor. Neither the Publisher nor Editor endorse or approve the Content of this book or guarantee the reliability, accuracy or completeness of the Content published herein and do not make any representations or warranties of any kind, express or implied, including but not limited to the implied warranties of merchantability, fitness for a particular purpose. The Publisher and Editor shall not be liable whatsoever for any errors, omissions, whether such errors or omissions result from negligence, accident, or any other cause or claims for loss or damages of any kind, including without limitation, indirect or consequential loss or damage arising out of use, inability to use, or about the reliability, accuracy or sufficiency of the information contained in this book.

Scanned with OKEN Scanner

# अनुक्रमणिका


1. कोरोना आणि भारत : सर्वंकष परिणामाची मीमांसा
प्रा.डॉ.कदम एच.पी. ......... 1

2. कोरोनाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम - एक अभ्यास -
प्रा .डॉ .अण्णाजी मडावी ......... 9

3. कोरोनाचा पर्यावरणावरील परिणाम -
डॉ. सचिन व्ही. तावडे ......... 18

4. महाराष्ट्र शासनाची कोरोना विरुद्धची मोहीम' : माझे कुटुंब ,माझी जबाबदारी 'ते' मी जबाबदार' -
शरद बाबुराव सोनवणे ........ 24

5. माणसाच्याच अस्तित्वाची ही लढाई आहे...
प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे ......... 33

6. कोरोना महामारीचा भारतीय समाजावरील परिणाम
प्रा. विलास सोमा पवार ......... 39

7. आर्य सत्य व कोरोना... प्रा.डॉ.तोळमारे शशिकांत शिवापा ......... 46

8. कोरोना आणि भारतीय समाजव्यवस्था
प्रा. डॉ. मारोती बालासाहेब भोसले ........... 51

9. कोरोना आणि भारत -प्रा.डॉ.निंबा बळवंत कोठावदे ......... 60

10. कोरोना आणि मानसिक स्वास्थ्य -
प्रा.अनिल शशिकांत हिरगोंड ......... 66




Scanned with OKEN Scanner

11.कोरोना महामारीचा प्रभाव - प्रा .डॉ. आंधळे बी.व्ही ......... 75

12.कोरोना महामारीचा स्त्रियांच्या आयुष्यावरील परिणाम
डॉ सीमा शशिकांत कदम. ......... 83

13.कोरोना महामारीत भारतीय अर्थव्यवस्था : मानवी अधिकार उल्लंघन
नांगरे विठ्ठल हरिभाऊ ......... 90

14.कोरोना साथरोग आणि समाजातील अंधश्रद्धा
प्रा. डॉ. संतोष वसंतराव रणखांब ........103

15.कोरोनाचा भारतीय शिक्षण व्यवस्थेवरील परिणाम
प्रा. निखिता गावकर ........ 116

16.कोरोनाचा भारतीय शेती व्यवसायावर झालेला परिणाम
प्रा .विनायक जाधव ....... 120

17.कोविड १९ विषाणूचा भारतीय उच्च शिक्षणावरील प्रभाव
प्रा.डॉ. मुक्ता सोमवंशी ....... 126

18.कोरोना १९ महामारीचे परिणाम, आव्हाने आणि संधी
डॉ. एम बी वाघ ....... 133

19.करोना भारतीय शिक्षणव्यवस्थेवरील परिणाम
प्रा. आनंद मुसळे ....... 140

20.कोविड-१९ (Covid-19): भारतीय अर्थव्यस्थेवर झालेले परिणाम
अर्जुन अशोक मोरे ....... 147

21.कोरोना महामारी - डॉ.काळे बी.एम ....... 155

Late Ramesh ... ACS College Sonpeth Pin-431516 Dist.Parbhani

22.कोरोना के समय का भारत - डॉ कुलकर्णी वनिता बाबुराव ....... 162

23.कोरोणा व्हायरस महामारी और मानवता की परीक्षा
प्रा.डॉ.महावीर सुरेशचंद उदगीरकर ....... 172

24.कोरोनाचा शिक्षण क्षेत्रावर झालेला परिणाम
प्रा.डॉ.मारोती धोडींबा कच्छव ......... 183

25. कोरोना काळातील लॉकडाऊनचे श्रमशक्ती व अर्थव्यवस्थेवर झालेले परिणाम
प्रा .डॉ .पांडुरंग मुंढे ....... 194

26. कोरोनाचा भारतीय शिक्षण व्यवस्थेवरील परिणाम
प्रा. संदीपकुमार मारोतराव देवराये ........200

Scanned with OKEN Scanner

# कोरोना साथरोग आणि समाजातील अंधश्रद्धा

**प्रा. डॉ. संतोष वसंतराव रणखांब**

विभाग प्रमुख, प्राणीशास्त्र विभाग, कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय सोनपेठ जि परभणी.

santosh.rankhamb@gmail.com

=====

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. भारतामध्ये सर्वच प्रकारच्या विविधता या आपणास पहावयास मिळतात. भारतात भौगोलिक, राजकीय, सांस्कृतिक आणि जैविक बाबतीमध्ये असणाऱ्या विविधतां बरोबरच अनेक प्रकारच्या विविधता आपणास पहावयास मिळतात. भारतातील या विविधतेत एकता हे भारताचे सौंदर्य आहे. भारतीय समाज हा विविध रूढी परंपरा असणारा समाज आहे. भारतामध्ये ज्ञान, विज्ञान यांचा ज्या पद्धतीने आधुनिक काळात प्रसार झालेला आहे, त्याचप्रमाणे अज्ञान व अंधश्रद्धाही मोठ्याप्रमाणावर पहावयास मिळतात. ज्याप्रमाणे भारतीय समाज हा विविध समूह, जाती-धर्म यांनी बनलेला आहे. त्यातच अनेक प्रकारच्या वेगवेगळ्या पद्धती असलेल्या अंधश्रद्धा आणि त्या अंधश्रद्धा बद्दल असलेला विश्वास हा भारतीय समाजासमोरील खूप मोठा प्रश्न आहे.

अनेक आजार आणि त्यातल्या त्यात साथरोग जेव्हा भारतामध्ये पसरतात, त्यावेळी या साथरोगांबद्दल अनेक प्रकारच्या अफवा आणि अंधश्रद्धा भारतीय समाजामध्ये पसरतात, हे आत्तापर्यंतच्या वेगवेगळ्या

साथ रोगांमध्ये आढळून आलेले आहे. पूर्वी साथ रोगांमध्ये देवी आणि प्लेग नावाचे रोग भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर महामारीचे स्वरूप घेत असलेले आपणास पहावयास मिळतील. इतिहासात या दोन्ही साथ रोगांमध्ये भारतीय समाजामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या अंधश्रद्धा पसरलेल्या आपणास पहावयास मिळतात. देवी रोगाच्या संदर्भामध्ये प्राचीन भारतीय समाजामध्ये हा रोग पसरण्याचे कारण म्हणजे देवीचा प्रकोप आहे, असे समजले जात होते. त्यामुळे देवी रोगाच्या काळामध्ये वेगवेगळ्या देवी-देवतांची उपासना करणे, अघोरी तंत्र - मंत्र आणि विचित्र उपचार भारतीय समाजातील सामान्य लोक करत असताना लक्षात येईल. इंग्रज राज्यकर्ते हे रोग आटोक्यात आणण्यासाठी वेगवेगळे कायदे आणि विविध वैज्ञानिक कारणांचा अभ्यास करून विज्ञानावर आधारित असलेली उपचार पद्धती भारतीय समाजामध्ये रूढ करू पाहत होते. त्यासाठी अनेक वेळा त्यांना सक्तीचाही वापर करावा लागत असे, त्याचा परिणाम म्हणून इंग्रजा बद्दलचा राग भारतीय समाजामध्ये त्याकाळात वाढलेलाही पहावयास मिळतो. मुंबईत 1896 साली प्लेगच्या साथीने थैमान सुरू केलं. त्यानंतर पुण्यातही प्लेगचा हाहाकार माजला. दोन वर्ष मुंबई-पुण्यात ब्रिटिशांच्या राजवटीखालील प्रशासनाने प्लेगला रोखण्यासाठी कठोर प्रयत्न सुरू केले होते. फेब्रुवारी 1897मध्ये संसर्गजन्य रोग प्रतिबंधक कायदा अस्तित्वात आला. प्लेगसारख्या अकल्पित आणि अचानक उद्भवलेल्या आजाराने लोकांमध्ये भीती निर्माण झाली होती. त्यात त्याकाळी समाजावर अंधश्रद्धांचा पगडा होता. साहजिकच हा आजार म्हणजे देवीचा कोप आहे असा लोकांचा समज होता. प्लेग सारख्या महाभयानक रोगांमध्ये लोक देवी चा गाडा ओढणे किंवा इतर देवी-देवतांचा प्रकोप होऊ नये, यासाठीच मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करत असत. प्राण्यांचे बळी देणे, देवी-देवतांना खूष करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे



Scanned with OKEN Scanner

यज्ञयाग करणे, अशा प्रकारचे सामान्य अंधश्रद्धाळू पणाचे उपाय यासाठी रोगांचा अभ्यास करताना आपणाला सर्रास दिसतील.

अशा प्रकारच्या महामारी मध्ये गावांमधून समूहाने राहणारे लोक गावाच्या बाहेर राहण्यासाठी जात असत, तसेच ज्या व्यक्तींना हा आजार झालेला आहे त्या व्यक्तींपासून ही तर कुटुंबातील व्यक्तींनी दूर राहावे यासाठी प्रयत्न केले जात असत.

मोठ्या प्रमाणावर असलेले अज्ञान आणि अंधश्रद्धा हे भारतीय समाजाच्या मानसिकतेची पकड घेतलेले दोन घटक दूर करण्यासाठी अनेक महामानवांना संघर्ष करावा लागला. त्यापैकी एक महान स्त्री सावित्रीबाई फुले यांना प्लेगच्या साथीमध्ये प्लेगचा रुग्णांची सेवा करत असताना या साथ रोगा मध्येच आपला प्राण गमवावा लागला होता. प्लेगचा संसर्ग रोखण्यासाठी अज्ञान काढून शाहूंनी आजाराची शास्त्रशुद्ध माहिती देणारी हजारो पत्रकं गावोगावी वाटली. निरक्षर लोकांची संख्या अधिक असल्याने गावागावांमध्ये सभा भरवून त्याचं वाचनही करवून घेतलं.
सरकारी उपाययोजनांची माहिती पोहचवण्यासोबतच लोकांनी काय खबरदारी घेतली पाहिजे, याविषयीही जाहिरनामे वेळोवेळी प्रसिद्ध केले. प्लेगचा उद्रेक पाहता कोल्हापूर संस्थानचे दिवाण रघुनाथराव व्यंकोजी सबनीस यांची प्लेग कमिशनर म्हणून नेमणूक करण्यात आली. दोन वर्षांनंतर भास्करराव जाधव यांनी प्लेग कमिशनरपदाची सूत्रं सांभाळली. कोल्हापूरमध्ये प्रतिबंधात्मक उपाय योजल्यामुळे इतर शहरांच्या मानाने कमी हानी झाली. रयतेचा राजा म्हणून ओळख मिळवलेल्या राजर्षी शाहू महाराजांनी प्लेगची साथ रोखण्यासाठी प्रशासन राबवलं तो दृष्टीकोन आजच्या काळालाही लागू होतो.
साध्या तापीचे रुग्ण असतील आणि तशा प्रकारचा साथरोग पसरत असेल तर लोक त्यालाही भुताटकी किंवा हा देवाचा प्रकोप समजून अनेक



Scanned with OKEN Scanner

अंधश्रद्धाळू पणाचे उपाय करत असलेले आपणास त्या काळामध्ये दिसून येतील.

एकविसाव्या शतकामध्ये नवीन नवीन रोगांचे प्रसार होताना भारतीय समाजात मात्र ही अंधश्रद्धेची मानसिकता आपणाला मोठ्याप्रमाणावर पहावयास मिळेल. बर्ड फ्लू, स्वाईन फ्लू किंवा इतर प्रकारचे कुठलेही साथरोग भारतामध्ये पसरताना त्याबाबतची नवनवीन अंधश्रद्धेची वेगवेगळी प्रकरणे आपणास पहावयास मिळतील. एके दिवशी रात्री झोपणारा झोपेन आणि जागणारा जागेन, कोरोना व्हायरसंबंधीची ही अफवा राज्यातल्या एका गावातून दुसऱ्या गावात वाऱ्यासारखी पसरली. या अफवेमुळे राज्यातल्या लातूर, नांदेड, बीड, परभणी, बुलडाणा, अहमदनगर या जिल्ह्यांतील गावांमधील माणसानी अख्खी रात्र जागून काढली.

अंधश्रद्धा निर्मूलनासाठी सरकारने कायदे केले असले तरीही अनेक बाबा आणि बुवा हे तंत्र-मंत्र च्या साह्याने रोग दुरुस्त करण्याचे दावे करत असताना भारतामध्ये आपणास पहावयास मिळतात.

अज्ञानाचा आणि अंधश्रद्धांचा त्याच बरोबरीने अफवांचे पेव हे अलीकडच्या तंत्रज्ञानाच्या आधारे सुद्धा पसरवणारे अनेक लोक आपणास भारतीय समाजामध्ये पहावयास मिळतील. **ग्रामीण भागातील काही अफवा ज्या सर्रास कुणाच्याही तोंडून ऐकायला** मिळाल्या – 1) बाईला जितके लेकरं, तितके दिवे तिनं देवासमोर लावले तर कोरोना होत नाही. 2) कोरोनापासून ज्यांना बरं वाटलं नाही, त्यांना इंजेक्शन देऊन मारून टाकल जात. 3) सरकारने अजून करोनाग्रस्तांचा खरा आकडा सांगितला नाही. आपल्यापासून तो लपवला जात आहे. 4) कोरोना आलाय, आता लवकरच



Scanned with OKEN Scanner

या जगाचा अंत होणार आहे. 5) सरकार लवकरच विमानातून औषध फवारणी करणार आहे. 6) कोरोनाचा विषाणू जमिनीवरून चालतो. कोरोना सारखा महाभयंकर रोग जगभरामध्ये थैमान घालत असताना भारतामध्ये ज्या काही घटना घडत आहेत किंवा आपणास पहावयास मिळत आहेत त्या पाहून कुठल्याही वैज्ञानिक दृष्टिकोन असणाऱ्या माणसाला आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही.

जगात कोरोना साथ रोगाने सध्या थैमान घातले आहे. या विषाणूंचा प्रादुर्भाव सर्वात प्रथम चीनमध्ये पहावयास मिळाला. पहिल्यांदा चीनच्या आरोग्य अधिकाऱ्यांनी २६ डिसेंबर २०१९ रोजी वुहान शहरात संक्रमक कोरोना व्हायरस आढळल्याची पुष्टी दिली. ३० जानेवारी २०२० रोजी जागतिक आरोग्य संघटनेने ह्या विषाणूचा उद्रेक हा सार्वजनिक आरोग्यविषयक आंतरराष्ट्रीय आणीबाणी असल्याचे जाहीर केले. ११ मार्च २०२० रोजी कोरोनाचा उद्रेक हा जागतिक महामारी असल्याचे जाहीर करण्यात आले. २९ जानेवारी २०२० रोजी भारतातील पहिला रुग्ण हा केरळमध्ये आढळला. महाराष्ट्रातील कोरोना व्हायरसची लागण झालेला पहिला रुग्ण पुण्यामध्ये ९ मार्च २०२० रोजी आढळून आला. महाराष्ट्रातील पहिला बळी १६ मार्च २०२० रोजी मुंबईतील कस्तुरबा रुग्णालयात उपचारादरम्यान झाला.

या विषाणूचा प्रादुर्भावाबरोबरच भारतात अफवांचे पेव फुटू लागले. त्याच बरोबर वेगवेगळ्या प्रकारच्या अंधश्रद्धा आणि विविध समूहांचे एकमेकाबद्दल द्वेष पसरवणारे प्रकारही घडू लागले. याबद्दल बी बी सी या वृत्तवाहिनीने दिलेल्या वार्तांकनाच्या अहवालामध्ये म्हटले आहे, अभ्यासात असं आढळून आलं की, एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात मोठ्या प्रमाणावर मुस्लिमांना लक्ष्य करणाऱ्या फेक न्यूज पसरवण्यात आल्या होत्या.



Scanned with OKEN Scanner

दिल्लीत तबलिगी जमात या मुस्लिमांच्या एका संघटनेच्या कार्यक्रमासाठी हजारोंच्या संख्येने मुस्लिम अनुयायी जमले होते. त्यातले अनेक जण कोरोनाग्रस्त आढळल्यानंतर त्यासंबंधीच्या अनेक फेक न्यूज सोशल मीडियावर व्हायरल होत होत्या.

या संघटनेच्या सदस्यांमधले अनेक जण कोव्हिड पॉझिटिव्ह आढळू लागल्यानंतर या लोकांमार्फत जाणीवपूर्वक साथ पसरवली जात असल्याचे दावेही व्हायरल झाले होते.

मुस्लिम व्यावसायिकांवर बहिष्कार घालण्याचं आवाहन देशातल्या अनेक भागातून करण्यात येत होतं.

गाईचे शेण व गोमूत्र वेगवेगळ्या प्रकारचे काढे, गाद्या, चहा यांच्यामुळे कोरोनापासून बचाव होईल अशा प्रकारचे वेगवेगळे विचित्र दावे करण्यास लोकांनी सुरुवात केली. कोरोनाचा विषाणू हा उष्ण वातावरणात टिकू शकत नाही. भारत हा तर समशितोष्ण कटिबंधातला देश आहे शिवाय उन्हाळा लागला होता. तापमान वाढणार. मग काय भारतात कोरोना येऊच शकत नाही. किंवा आला तरी तो पसरणार नाही अशी बातमी सोशल मिडियावर व्हायरल होऊ लागली.

या अफवेला पहिले खिंडार तेव्हा पडले जेव्हा कोरोनाचा पहिला रुग्ण भारतात सापडला आणि अवघ्या काही दिवसांतच कोरोना विषाणू बाधित रुग्ण सगळ्या राज्यांत सापडू लागले.

शरीराचे तापमान वाढले की कोरोना मरतो ही अशीच आणखी एक अफवा यावेळी पसरू लागली. मग उन्हात पंधरा मिनिटे उभे राहण्याचा सल्ला सुरू झाला. उन्हात उभे राहिले की कोरोना तुमच्या शरीरातून गेलाच म्हणून समजा असे दावे करण्यात आले. हे असे दावे करणाऱ्या लोकांना

आपल्या शरिरात तापमान नियंत्रण करणारी अशी एक संस्था असते हे ही ठाऊक नसते. बरं कुठलाही ठोस पुरावा नसलेली ही विधाने अगदी 'शास्त्रीय माहिती' म्हणून आपोआप इकडून तिकडे व्हायरल होऊ लागली. दर दोन तासांनी गरम पाणी पिले तर घशातला व्हायरस घशातच मरतो अशीही अफवा पसरू लागली. मग गरम पाणी सतत प्या असा आग्रही सल्लाही मिळू लागला. कोरोना विषाणूचा संसर्ग झाला की हा विषाणू सर्वप्रथम घशात जातो. तिथे तो चार तास थांबतो. मगच तो खाली फुफ्फुसाकडे जातो. अशा प्रकारचा एक अतिशय आखीव रेखीव आणि वनस्टॉप प्रवास कोणीतरी शोधून काढला. मग या विषाणूला घशातच पकडून तिथेच त्याचा काटा काढायचा असा जावईशोध कोणीतरी शोधून काढला. कोमट पाण्यात मीठ टाकून गुळण्या केल्यास विषाणू घशातच मारला जातो, फुफुसात संसर्ग होत नाही.

काही बोगस आयुर्वेदिक व होमिओपॅथी औषधी कंपन्यांनीही या वाहत्या गंगेत हात धुण्याचा प्रयत्न केला. कोरोना विषाणूला नष्ट करण्याचा खात्रीलायक उपाय म्हणून औषधांचे मार्केटिंग होऊ लागले. अगदी बेधडकपणे 'आयुष' मंत्रालयाचा दाखलाही देण्यात येऊ लागला. दुर्दैवाने या औषधांच्या उत्पादनावर आणि गुणवत्तेवर कोणताही अंकुश नसल्याने कोरोनाची धास्ती घेतलेली सामान्य भाबडी जनताही याला बळी पडली.

अशा ह्या अंधश्रद्धेच्या प्रसाराला लोक बळी पडतात. कोरोना पासून वाचण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे मंत्र तंत्र आणि वस्तू यांचा सुळसुळाट भारतीय समाजामध्ये झालेला आपणास पाहवयास मिळेल. कोरोना साथ रोगावर तंत्र-मंत्र च्या सहाय्याने उपचार करण्याचा दावा करणारे बाबा बुवा लोक काहीवेळा अटक करण्यात ही आले होते, अशा प्रकारचे प्रकार हैदराबाद वाराणसी आणि अनेक ठिकाणी घडले. एकीकडे सर्वजण कोरोना साथरोगाशी लढण्यासाठी संपूर्ण वैज्ञानिक तयारी करण्यात मग्न होते.



Scanned with OKEN Scanner

अशा परिस्थितीत भारतातील आसाम बिहार उत्तर प्रदेश इत्यादी राज्यांमध्ये काही ठिकाणी महिलांनी कोरोना देवीची स्थापना केली. त्या कोरूना देवीची पूजाअर्चा करण्यासाठी शेकडो महिला एकत्र जमल्या आणि त्यांनी ठाम विश्वास दाखवला की ही कोरणा देवी आम्हाला कोरोना रोगापासून वाचवेल. कोरोना देवीची स्थापना करून तिची पूजाअर्चा करत असतात, तर वेगवेगळ्या पद्धतीच्या अफवा आणि चर्चा घडवून काही लोकप्रतिनिधी व लोकमान्यता असणारे लोक ही अशा प्रकारच्या चर्चांमध्ये आघाडीवर असतात. या अनिष्ट आणि अंधश्रद्धेच्या प्रकारांमधून कोरोना महामारी च्या काळात घडलेला एक प्रसंग म्हणजे गुजरात मध्ये एका युवकाने कोरोना चा प्रादुर्भाव नष्ट होण्यासाठी देवीसमोर स्वतःची जीभ कापली. कधी लोकांची फसवणूक करण्यासाठी काही लोक संघटितपणे अशा प्रकारच्या अफवा आणि व्यवसायिक दृष्टिकोनातून अंधश्रद्धा पसरवण्याचे काम करतात. काही संघटनांच्या प्रतिनिधींनी गोमूत्र पार्टीचे आयोजन केले, काही ठिकाणी हातामध्ये मशाली घेऊन फेऱ्या काढण्यात आल्या, काही ठिकाणी जोरजोरात टाळ्या वाजवत दिवाळी प्रमाणे फटाके फोडण्यात आले. अशाप्रकारे अंधश्रद्धांचा कहरच या महामारीच्या काळामध्ये पहावयास मिळाला. अशा सर्व प्रकारांमधून भारतीय समाज कोरोनाशी लढण्याचा प्रकार करत असताना, काही लोक मात्र वेगवेगळे काढे, आयुर्वेदिक औषधी या कोरोनावर फार उपयोगी असून त्यामुळे कोरोनावर मात करता येईल अशा प्रकारच्या जाहिराती ही करत होते, या लोकांबद्दल शास्त्रज्ञ किंवा वैज्ञानिक लोकही काही जास्त बोलू शकत नव्हते कारण या लोकांना धार्मिक संरक्षण असते त्यांचा विशिष्ट असा भक्तगणांचे समुह असतात.

दुसऱ्या बाजूला वैज्ञानिक मंडळी या रोगा बद्दल माहिती जमा करण्याचे आणि त्यामधून त्यावर उपाय योजना करण्याचे काम संपूर्ण जगभर करत आहेत, त्यामधील काही शास्त्रज्ञांना यशही मिळाल्याचे समजते, परंतु या



Scanned with OKEN Scanner

कोरोनासाथ रोगामध्ये सर्वसामान्य कष्टकरी यांच्या बरोबरीने मध्यमवर्गातही खूप मोठ्या प्रमाणावर अंधश्रद्धा पसरत होत्या, त्यामधून वेगवेगळ्या पद्धतीचे परिणामही दिसत होते. भारतीय समाजातील अतिशय कठीण प्रसंगातही द्वेष पसरवण्याचे काम करणाऱ्या काही समाजकंटकांचे गटही मढ्याच्या टाळुवरचे लोणी खाण्यासारखे प्रकार या वेळेत करून धार्मिक, जातीय द्वेष किती वेगाने पसरवू शकतात, हेही या कोरोना साथ रोगाच्या काळामध्ये आपणास पहावयास मिळल. तसेच लोकांच्या या अंधश्रध्दाळू पणाचा गैरफायदा घेऊन कुठल्याही प्रकारचे टिनपाट उत्पादने निर्माण करून आपली उत्पादने किती परिणामकारक आहेत हे अवैज्ञानिक रीत्या सांगून व्यवसाय करणारे उद्योगातील काही महाभागही यानिमित्ताने सर्वांना दिसून आले.

भारतीय समाजामध्ये मोठ्या प्रमाणावर विषमता आहे तळहातावर पोट घेऊन जगणारे असंख्य कामगार जे आपल्या उदरनिर्वाहासाठी शहरात स्थलांतरित झालेले होते, ते सर्व लोक लॉकडाऊनच्या काळामध्ये अतिशय वाईट परिस्थिती मध्ये वाहनांची सोय नसल्याने पायाने स्थलांतर करीत शेकडो किलोमीटर चालले. अज्ञान आणि अंधश्रद्धा यामुळे सर्वसामान्य माणूस हा जणू काय जंगलामधे वणवा लागल्यानंतर ज्या पद्धतीने प्राणी वाट फुटेल तिकडे पळत असतात तशाच पद्धतीने सुरवातीच्या काळामध्ये बाल वृद्ध तरुण सर्वच सामान्य लोक भय व भुकेच्या भीतीने वाट फुटेल तसे पळत होते. त्याच वेळी धर्माचा पगडा असणारे लोक गर्दीने एकत्र येत आरत्या, नमाज व काही धार्मिक उत्सव करण्यासाठी प्रयत्न करत होते.

या माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात सत्य-असत्य न तपासता अफवांचे पेव फुटत होते काही लोक या अफवा पसरताना दिसत होते अंधश्रद्धा हा पसरवून समाधान मानत होते आणि सामान्य माणसे या अंधश्रद्धेला बळी

पडत होते. या अंधश्रद्धा आहेत हे त्यांना कोणी समजावून सांगितले तर त्याच्यावर शाब्दिक व शारीरिक हल्ले या आज्ञानी सुशिक्षित, अर्धशिक्षित, अल्पशिक्षित किंवा निरक्षर लोकांकडून केले जातात.

कोरोना महामारी च्या काळामध्ये भारतीय समाज व्यवस्थेमध्ये ज्या पद्धतीने अफवांचे आणि अंधश्रद्धेचे प्रकार पहावयास मिळाले ते जगामधल्या कुठल्याही इतर देशांमध्ये पहावयास मिळतील की नाही? हे सांगता येत नाही. त्यामुळे या अंधश्रद्धेच्या गर्तेमधून भारतीय समाज बाहेर काढणे खूप आवश्यक आहे. अज्ञान आणि अंधश्रद्धा याचे सर्वात मोठे कारण म्हणजे भारतामध्ये असलेली गरिबी आणि विषमता यामध्ये या सर्व प्रकाराची मुळे रुजलेली दिसतात. स्वातंत्र्यानंतर 74 वर्षांनीही अंधश्रद्धेचे हास्यास्पद प्रकार भारतामध्ये नवनवीन पद्धतीने वाढतात हा संपूर्ण भारतीय मानसिकतेचा अभ्यास करण्यासारखी गोष्ट आहे.

भारतातील वैज्ञानिक आणि लोकशिक्षण या सारख्या विषयावर लोकांनी विरोध करणे हे अनाकलनीय आहे. येणाऱ्या पुढील पिढ्यांमध्ये नेमके आपणास काय करावयाचे आह? भारतीय समाजाला कोणत्या दिशेने घ्याव घेऊन जावयाचे आहे याबद्दल निश्चित धोरण समाजधुरिणांना आणि सामाजिक विकासाच्या बाबतीत सजग असणाऱ्या नागरिकांनी आखले पाहिजे.

या सर्व अंधश्रद्धेच्या प्रकारांचा विचार करता यामधून आपणास काही निष्कर्ष काढता येतात.

**निष्कर्ष** : १) भारतीय समाजाच्या भीतीच्या परिस्थितीतही काही लोक स्वतःचा व्यवसाय किंवा बहुसंख्य घाबरलेल्या समुदायाचे समुपदेशन करण्यापेक्षा त्यांना लुबाडण्याचे काम करत होते.



Scanned with OKEN Scanner

२) राजकारण हे अशा भीतीच्या परिस्थितीमध्ये लोकांना धीर देऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करण्याचे माध्यम बनवण्याऐवजी भारतातील काही संघटना आपला द्वेषाचा अजेंडा पुढे राबवताना दिसले. विशेषत्वाने त्यामध्ये सर्वसामान्य कष्टकरी विरोध व धार्मिक द्वेषाचा प्रसार करताना आढळून आले.

३) महामारी च्या काळामध्ये अंधश्रद्धा आणि सहजपणे ठेवली जाणारी श्रद्धा यांच्यामुळे मोठे नुकसान होऊ शकते.

४) भारतीय समाजामध्ये वैज्ञानिक साक्षरता आणि वैज्ञानिक दृष्टिकोण यांचा फार मोठा अभाव असून वैज्ञानिक साक्षरता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा प्रसार होणे आवश्यक आहे, त्यासाठी सामूहिक रित्या विशेष प्रयत्न करावे लागतील.

५) धार्मिक आणि विशिष्ट समूह बद्दल पसरवला जाणारा द्वेष आणि त्यामधून होत असलेला राजकीय फायदा यामुळे त्यांना मिळणारे संरक्षण संपवण्यासाठी लोकांमध्ये धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय एकात्मता यांचा प्रसार आणि प्रचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

६) भारतातील अंधश्रद्धा या केवळ कायद्याच्या बडग्यामुळे थांबवू शकल्या जाऊ शकत नाहीत त्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम राबवून जनजागृती करणे अत्यंत आवश्यक आहे.

**संदर्भसूची**

1) कोरोना व्हायरसच्या काळात शाहू महाराजांकडून काय शिकण्यासारखं आहे?
https://www.bbc.com/marathi/india-52555009

2) मथानिया में कोरोना भगाने का झाड़ा देने वाले तांत्रिक को पकड़ा



Scanned with OKEN Scanner

https://dainik-b.in/Irvoo2P2q8

3) Coronavirus: गुजरात में कोरोना के प्रभाव को खत्म के लिए युवक ने काटी जीभ

https://www.jagran.com/gujarat/vadodara-youth-cut-tongue-to-end-corona-influence-in-gujarat-20204754.html

4) केरल: रोजाना कोरोना देवी की पूजा करता है ये शख्स, सोशल मीडिया पर ट्रोलिंग

https://www.amarujala.com/amp/india-news/man-conducts-daily-pujas-for-corona-devi-in-kerala

5) कोरोना व्हायरस: गोमूत्र प्यायल्यानं कोरोनापासून रक्षण होतं का?

https://www.bbc.com/marathi/india-51979582

6) **कोरोनाबद्दल पसरवलेल्या अफवा कोणत्या?**

https://mr.quora.com

7) कोरोना व्हायरस: महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात नेमकं काय सुरू आहे?

https://www.bbc.com/marathi/india-52059448

8) भय, भुक, अज्ञान व कोरोनाची वास्तविकता

https://www.esakal.com/blog/fear-hunger-ignorance-and-reality-corona-276373

9) कोरोना वायरस का मंत्र से शर्तिया इलाज कर रहे थे 'कोरोना बाबा', हुए गिरफ्तार

10) https://www.aajtak.in/india/uttar-pradesh/story/corona-virus-uttar-pradesh-varanasi-corona-baba-police-samne-ghat-arrest-1041005-2020-03-19

11) Corona बाबा गिरफ्तार, तंत्र-मंत्र से संक्रमण ठीक करने के नाम पर लूटता था मरीजों को



Scanned with OKEN Scanner

https://www.tv9hindi.com/india/corona-baba-arrested-for-robbing-people-in-hafeezpet-hyderabad-253437.html

12) राम पुनियानी का लेखः कोरोना से लड़ाई में अंधश्रद्धा की जगह नहीं, सरकार के साथ बीजेपी-संघ को भी होना होगा गंभीर

https://www.navjivanindia.com/opinion/no-space-for-blind-faith-in-fight-against-corona-so-bjp-sangh-too-have-to-be-serious-with-govt-article-by-ram-puniyani

Scanned with OKEN Scanner